## //प्रकरण "५" वे//

## ::उपसंहार::

SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR *

## // प्रकरण ५ वे //

## : : उपसंहार : :

आत्तापर्यंत आपण तुकारामांचे चरित्र, पौराणिक व लौकिक कथा, तसेच व्यक्तिचित्रे यांचा विचार केला.

पहिल्या प्रकरणात तुकारामांच्या जीवन चरित्राचे प्रास्ताविक, सांसारिक आपत्ती, बाह्य संकटांचा वर्षाव, परमेश्वर भक्तीकडे वळणे, गुरुपदेश, अध्ययन-व्यासंग, आर्तभक्ती, तुका आकाशाएवढा, अर्थपूर्ण उपदेश, संतसांगाती, छळ ह्य... जलदिव्य, अभंगगाथा, निर्याण या मुद्यांच्या आधारे विवेचन केले.

तुकारामांचे हे जीवनचरित्र पाहिले की, जाणवते त्यांच्या जीवना-बरोबर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा व पर्यायाने त्यांच्या काव्यरचनेचाही विकास झाला. प्रपंच व परमार्थ यांच्यातील झगड्याला त्यांना सामोरे जावे लागले. त्यांना परमेश्वराविषयी जेवढी उत्कट भक्ती होती, तेवढीच सामान्य जनांचा पारमार्थिक विकास व्हावा या विषयीची प्रचंड तळमळ होती. त्या भक्तीतून व तळमळीतूनच त्यांची अभंगरचना साकार झाली. तुकारामांच्या या अभंगरचनेत ठळकपणे आपणास काही कथा जशा जाणवतात, तशीच काही व्यक्तिचित्रेही जाणवतात.

दुसऱ्या प्रकरणात पौराणिक कथा अभ्यासल्या त्याविषयी खालील निरीक्षणे नोंदवता येतात.

हत्ती, सुसर व गजेंद्र यांच्या वर्णनात स्थल, काळ व कृती यांचे ऐक्य जाणवते.

वाईट वर्तन करणाऱ्या कुब्जा, वाल्या कोळी, इत्यादींना उध्दाराचा मार्ग दाखवणे, श्रीकृष्ण व त्यांचे मित्र श्रीकृष्ण व यशोदा, श्रीकृष्ण व गोपी यांचे भावसंबंध रेखाटणे यातून विषयवैचित्र्य लक्षात येते.

बळी - दुर्वास कथा, दामाजीपंत - बादशहा कथा, प्रल्हाद - भरत - बिभीषण कथा, शुक्राचार्य - जनकराजा कथा यातून तार्किक सुसंगती जाणवते.

इंद्र - श्रीकृष्ण यांच्या संघर्षातील परिणामकारकता लक्षात येते.

या कथांतून भक्तपाळक, सर्वांविषयी समान भाव असणारा, चुका सुधारणाऱ्या भक्ताला मदतीचा आधार देणारा, गरीब-श्रीमंत या भेदा पलिकडच्या एकनिष्ठ भक्ताची जबाबदारी घेणारा, चांगल्याचे संरक्षण व दुष्टाचा संहार करणारा अनंत अविनाशी, निर्मिक, नाश व पुनर्निर्मिती करणारा सर्वसामान्यात राहून अलौकिक कृती करणारा ईश्वर आपल्यासमोरे येतो. आणि त्याचवेळी चुका सुधारणाऱ्या भक्ताला भक्तीचा आधार आहे हे जाणणारा भक्त जसा येथे आहे, तसाच सामान्यांना सर्व गोष्टींचा त्याग करुन ईश्वराकडे जावे लागते. याची जाणीव असणाराही भक्त येथे भेटतो. त्याचप्रमाणे लौकिक जगाची निष्फलता लक्षात आल्यावर ईश्वराला शरण जाणारा सामान्य मानवही या कथांतून आपणापुढे दृग्गोचर होतो. सगुण ईश्वर व अत्यंत उत्कटतेने त्याच्यावर भक्ती करणारा भक्त यांचे नाते येथे विचारसौंदर्याचे रुप घेऊन प्रकट होते.

तुकारामांची भाषाशैली जनसामान्यांचे भाव अगदी सहजपणे प्रतिबिंबित करणारी, संवाद साधणारी, अल्पाक्षररमणीयत्व या विशेषाने विनटलेली आहे.

तुकारामांच्या या कथांच्या अभिव्यक्तीचा एक विशेष म्हणजे अतिशयोक्ती, उपमा, दृष्टान्त, अनुप्रास, यमक या अलंकारांची कलात्मक पखरण केलेली आहे.

या कथांतून भक्ती (परिक्षित - भगवंत कथा, श्रीकृष्ण -सुदामा कथा) वीर (सुदर्शन फिरविणारा कृष्ण), करुण (हरिश्चंद्र - तारामती, बळी - श्रीयाळ कथा) अद्भुत (श्रीकृष्णाने कुबेरपुत्राचा उध्दार केलेली कथा)

शांत (गोपींची श्रीकृष्णास विनवणी कथा) या रसांचा परिपोष झालेला आहे.

अन्वर्थक विशेषण (उदा - निर्गुण , निष्ठुर) तत्कालीन लोकजीवनाचे दर्शन घडविणारे वाक्प्रचार (उदा, तलब करणे) हे अभिव्यक्तीचे लक्षणीय विशेष आहेत.

या कथांचा अभिव्यक्तीचा आणखी एक विशेष म्हणजे प्रसाद गुण . हा रसिकांच्या प्रत्ययास वारंवार येतो.

आपण तिसऱ्या प्रकरणातील लौकिक कथा अभ्यासल्या त्या विषयी खालील निरीक्षणे नोंदविता येतात.

नाटयछटेची वैशिष्टये लेवून येणाऱ्या काही कथा जशा आहेत. तशाच नकारातून होकाराकडे येणाऱ्याही काही कथा आहेत.

अंगावर कढत पाणी पडणे, दाह होणे आर्त विनवणी यातून स्थळ, काल व कृती यांचे ऐक्य जाणवते.

मृत्युमुळे जीवन उद्ध्वस्त होणे, दुष्ट स्त्रीने फजिती करणे, इंद्रायणीत वहया बुडविणे, मेलेले मूल जिवंत करणे, संसारात सासूने रमणे यातून विषयवैचित्र्य लक्षात येते.

संकटामुळे ईश्वराकडे वळणे, सासूबाईचा घर ते वेस प्रवास यातून तार्किक सुसंगती प्रत्ययास येते.

मृत्यूच्या थैनानात स्थिर राहणे यासारख्या प्रसंगातून संघर्षातील परिणामकारकता स्पष्ट होते.

या कथांतून समाजदर्शन उदा : प्रांपचिक जीवनाचे उल्लेख (गोवऱ्या लिंपणे इत्यादी) जातिव्यवसाय संदर्भ (शेळ्या, मेंढया, पाळणारे धनगर) यांचे दर्शन घडते.

जीवनात अमर मूल्यांचा आधार आवश्यक, पारलौकिकाचे सम्यक् ज्ञान असणे अनिवार्य, खोटी भावना व्यक्त होणारच, कर्तव्यशून्य माणूस स्वहितास पारखा होणारच, हे भावनुभव विचारसौंदर्याचे रूप घेऊन प्रकट होतात.

संस्कृतप्रचुरशब्द, चित्रस्पर्शीत्व, नाटयमयता, अल्पाक्षररमणीयत्व या वैशिष्टयांनी तुकारामांची भाषाशैली विनटलेली आहे.

करुणरस (दुष्ट स्त्रीने फजिती करणे, मेलेले मूल जिवंत करणे ही कथा) व भक्तीरस (इंद्रायणीत वहया बुडवणे ही कथा) यांचा या कथांत परिपोष झालेला आहे.

आशयाचे महत्व सांगण्यासाठी शब्दांची पुनरुक्ती (उदा. देवाचे देऊळ) व वाक्प्रचार (उदा धरणे धरणे) विशिष्ट शब्द (उदा. चांडाळ) सुभाषितपर वचने ( उदा. होता भाव पोटी । मुखा आलासे शेवटी) हे अभिव्यक्तीचे लक्षणीय विशेष आहेत.

तुकारामांच्या अभंगातील या कथांचा आस्वाद घेताना प्रसाद या गुणाचा प्रत्यय रसिकांना येतो.

आपण चौथ्या प्रकरणात तुकारामांच्या अभंगातील व्यक्तिचित्रांचा विचार केला. त्याविषयी पुढील निरीक्षणे नोंदवता येतात. सामान्यपणे दुष्ट प्रवृत्ती व सुष्ट प्रवृत्ती आपल्यासमोर येतात. वावदुक वृत्ती विकारवशता, ढोंगीपणा, गाढवपणा, आपमतलबीपणा, संकुचितवृत्ती, भाबडेपणा दुष्टपणा, अनीतीने वागण्याची वृत्ती, गोंधळलेपणा, स्वार्थीपणा, अश्रध्दवृत्ती मृदुगाप्रमाणे वागण्याची वृत्ती, पूर्वसुकृतावर हवाला ठेवून दु:ख समशीतोष्ण करण्याची वृत्ती या दुष्ट प्रवृत्ती स्पष्ट होतात.

त्याचप्रमाणे सज्जनाशी मऊपणे वागण्याची तर दुर्जनाशी कठोरपणे वागण्याची वृत्ती, विठ्ठलप्रेम हीच संपत्ती मानण्याची वृत्ती, नम्रता, शांतता सद्भाव यांचा ध्यास धरण्याची वृत्ती, एकनिष्ठपणा, निःस्वार्थपणा या सुष्ट-प्रवृत्ती स्पष्ट झाल्या आहेत.

आचार-विचारातील सुसंगती, ध्येयाविषयीचा स्पष्टपणा, आत्मसाक्षात्काराचा अनुभव, कणखरपणा, आत्मविश्वास, पारंपरिकता, संतांचे गुणगान करण्याची वृत्ती हे तुकारामांच्या व्यक्तिचित्राचे विशेष जाणवतात.

या व्यक्तिचित्रात प्रसंगनिष्ठ विनोदाचे देखील उपयोजन तुकारामाने केलेले आहे. त्यामुळे व्यक्तिचित्रे अधिक चैतन्यमय झालेली आहेत.

वरील सर्व व्यक्तिचित्रे पुढील वर्णनांनी अधिक ठळक झालेली आहेत. तक्रारीच्या सुराने प्रारंभ व शेवटी पतीस धमकी देणे, शरीरावरील अलंकारांची नामावली, पथ्यकुपथ्य यांचे घोटाळे, पवित्र गाईला मारणे व त्याचवेळी धन्याच्या घोड्याची सेवा करणे, अन्न सेवन, ब्राम्हण भोजन, अन्नदान यापेक्षा संपत्ती श्रेष्ठ, बाह्यवेष, बाह्यवर्तन यावर भर, व्यसनाधीनतेचे वर्णन, वस्त्रे, चांदी यांचा ध्यास, मद्य, मांस, मैथुन यात मग्न, संतांना भेटताना अंग चोरणे तर व्याह्याला त्वरेने सामोरे जाणे, मुडासे नीट बांधणे, लहान मुलाचे खेळ, खोकल्यासारखी व्याधी यासगळ्या वर्णनातून त्या त्या व्यक्तीच्या वर्तनापाठीमागे कोणता भाव आहे हे स्पष्ट होते.

या व्यक्तिचित्रातून करूणरस व भक्तीरस यांचा जसा प्रत्यय येतो तसाच वत्सलभावाचाही प्रत्यय येतो.

ही व्यक्तिचित्रे यमक, अनुप्रास, दृष्टान्त या अलंकारांनी अधिक कलात्मक झालेली आहेत.

वाक्प्रचार, शब्दविशेष ( उदा - गधडा, रांड इ.) सुभाषितवजा वाक्य (मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास) यामुळे या व्यक्तिचित्रांची कलात्मकता वाढलेली आहे. आचार व विचार यांच्यात सुसंगती नसणे हे सामान्य माणसाचे लक्षण, पण ते मान्य करणे, त्याविषयीची हळहळ व्यक्त करणे हा प्रांजळपणा प्रकर्षाने जाणवतो. तसेच तुकाराम केवळ हळहळ व्यक्त करून थांबत नाहीत. तर आचार-

BARR. BALA... ...KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

विचारात सुसंगती आणण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत.

कथा आणि व्यक्तिचित्रे या दृष्टीने जेव्हा आपण या अभंगाकडे पाहतो तेव्हा जाणवते ते कथामधील विचारसौंदर्य आणि व्यक्तिचित्रातील प्रवृत्तीचे सौंदर्य तुकाराम या सौंदर्याचे केवळ वर्णन करीत नाहीत. तर त्याला चिंतनशीलतेची जोड देतात. त्यामुळे त्यांच्या कथा व व्यक्तिचित्रे ही गांभिर्याकडे ( Sincerity) कडे अधिक झुकलेली आहेत. असे म्हणावेसे वाटते म्हणूनच की काय हा कथा व व्यक्तिचित्रे एकाचवेळी सखोल अशी जीवनानुभूती घडवितात आणि त्याचवेळी चिरूचिर असा आनंदही रसिकांना देतात असे म्हणावेसे वाटते.

-=-=-=-=-=-